| | | | |
|---|---|---|---|
| CNR-MHCH030033212017 | दाखल तारीख | : | १२/०६/२०१७ |
| | नोंद तारीख | : | १२/०६/२०१७ |
| | निकाल तारीख | : | १३/०८/२०२६ |
| | कालावधी | : | ०९ व. ०२ म. ०१ दि. |

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.४), चंद्रपूर यांचे न्यायालयात**

**( पिठासिन अधिकारी – शिवाजी आर. गुळवे )**

**नियमीत फौजदारी खटला क्र. २३४/२०१७** **निशाणी क्र. ७६**

**गुन्हा नोंद क्र. १२७४/२०१६**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन** मार्फत,<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, रामनगर,<br>ता. व जि. चंद्रपूर. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. जे. खोब्रागडे |
| आरोपी | १. | **अमित सुभाष बिश्वास,**<br>वयः २७ वर्ष, कामधंदाः मजुरी, |
| | २. | **मिलन मिर्णाल हलदार,**<br>वयः २४ वर्ष, कामधंदाः मजुरी,<br>दोघेही राहणार – इंडस्ट्रीयल वार्ड, दुर्गा कॉलनी,<br>चंद्रपूर, ता. व जिल्हा – चंद्रपूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. एस. एम. तिवारी |

## भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०/११/२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | २१/११/२०१६ |

| | |
|---|---|
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | १२/०६/२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २२/१२/२०१७ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १६/०१/२०१८ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमीत सुभाष बिश्वास | १२/०२/२०१७ | १४/०२/२०१७ | भा. दं. वी. चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | -- | -- |
| २. | मिलन मिर्णाल हलदार | | | | | | |

**<u>भाग – क</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**<u>अ. अभियोगपक्ष</u>**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दिनानाथ अंबादास काकने | फिर्यादी | २९ |
| २. | मुन्ना दशरथ राठोड | पंच साक्षिदार | ५१ |
| ३. | राम दशरथ लिंगमवार | साक्षिदार | ७० |
| ४. | महेश चंदुजी केळझरकर | तपासी अधिकारी | ७१ |

**<u>अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)</u>**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |

| | | |
|---|---|---|
| २. | ३०/अ.सा.क्र.१ | रिपोर्ट |
| ३. | ३१/अ.सा.क्र.१ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ४. | ७२/अ.सा.क्र.४ | जप्ती पंचनामा |
| ५. | ७३/अ.सा.क्र.४ | कबुली जबाब |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक १३ ऑगस्ट, २०२६ रोजी)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

**०२.** दिनांक २०/११/२०१६ रोजी सायंकाळी ०७.१५ वाजताचे दरम्यान फिर्यादी त्याचे परिवारासोबत मयुर हॉटेल समोर चंद्रपूर उत्सव मेला पाहण्यासाठी त्याची गाडी क्र. एम.एच.३४–यु.८७०४ ने गेले व गाडी पार्कींगला लावली. उत्सव मेला पाहून रात्री ०८.३० वाजता ते गाडी उभ्या ठेवलेल्या ठिकाणी गेले असता त्यांची गाडी दिसून आली नाही. त्यांनी त्यांच्या गाडीचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला, परंतु ती मिळून आली नाही. त्यामुळे त्यांनी दुस–या दिवशी रामनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली.

**०३.** सदर रिपोर्टवरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निर्दशनास आल्यामुळे पहिली खबर क्रमांक १२७४/२०१६ भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये नोंदविण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री. महेश केळझरकर यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी अन्वेषना दरम्यान घटनास्थळी जाऊन दोन

पंचासमक्ष घटनास्थळ, जप्ती पंचनामे केले व साक्षीदारांचे बयाण नोंदविले. आरोपीस अटक करुन व अन्वेषन पुर्ण केल्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता (यानंतर 'फौ.प्र.सं.') चे कलम १७३(२) अन्वये अंतिम अहवाल दाखल करण्यात आले.

**०४.** माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर निशाणी २६ अन्वये दोषारोप ठेवला. सदरचा दोषारोप आरोपींना त्यांच्या बोलीभाषेतुन समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**०५.** आरोपींविरूद्ध अभिलेखावर पुरावा आलेला असल्यामुळे त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे तपासणीमध्ये त्यांचेविरूद्ध खोटा खटला दाखल केला असल्याचे कथन केलेले आहे. तसेच त्यांना त्यांचे बचावार्थ कोणतेही साक्षिदार तपासायचे नसल्याचेदेखील त्यांनी कथन केलेले आहे.

**०६.** अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अधिवक्ता श्री. आर. जे. खोब्रागडे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. तिवारी यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

**०७.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक २०/११/२०१६ रोजी १८.१५ ते १९.३० वाजताचे दरम्यान मयुर हॉटेल जवळ, इंडस्ट्रीयल वार्ड, चंद्रपूर, ता. चंद्रपूर, जि. चंद्रपूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीची मोटर सायकल क्र.एम.एच.३४– यु.८७०४ ही फिर्यादीचे संमतीविना | नाही |

| | | |
|---|---|---|
| | लबाडीचे उद्देशाने चोरी केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते |

## <u>का र ण मि मां सा</u>

०८. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी ''आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीची मोटर सायकल त्याचे संमतीशिवाय मुद्दाम लबाडीचे उद्देशाने चोरुन नेली'' या बाबी सिध्द केल्या आहे किंवा कसे हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

## <u>मुद्दा क्र.१ करीता</u>

०९. अभियोग पक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरीता फिर्यादी साक्षिदार क्र.१ दिनानाथ याचा पुरावा नोंदविण्यात आला आहे. त्याने त्याचे पुराव्यात असे कथन केले आहे की, दि.२०/११/२०१६ रोजी ते संध्याकाळी ०७.१५ ते ०८.०० वाजताचे दरम्यान परिवारासह उत्सव मेला पाहण्यासाठी मयुर हॉटेलच्या समोर बंगाली कॅम्प येथे त्यांची मोटर सायकल क्र. एम.एच.३४–यु.८७०४ ने गेले होते. त्यांनी त्यांची गाडी उत्सव मेला गेटच्या समोर गाडी पार्क करून आतमध्ये गेले. त्यांनी ०८.१५ वाजताचे दरम्यान परत बाहेर येऊन पाहिले असता त्यांची गाडी दिसून आली नाही. त्यांनी आजुबाजूला गाडीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्याकरीता गेले, परंतु पोलीसांनी त्यांना उत्सव मेला १०.०० वाजेपर्यंत असते, तुम्ही आजुबाजूला पाहा व नाही भेटली तर उद्या या असे म्हटले. त्यामुळे ते पुन्हा तेथे गेले व उत्सव मेलाच्या आजुबाजूचा परिसर पाहिला, परंतु गाडी मिळून आली नाही. त्यानंतर दुस–या दिवशी त्यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट (नि.क्र.३०) दिला. पोलीसांनी

चौकशी करून घटनास्थळ पंचनामा केला तसेच त्याचा जबाब नोंदविला. फेब्रुवारी मध्ये पोलीसांचा त्याची गाडी मिळाली म्हणून फोन आला. त्याने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पाहिले असता गाडीत पुर्ण बदल केलेला होता. गाडीच्या चेसीस व इंजिन नंबरवरून गाडी ओळखू आली. आरोपींनी गाडी चोरल्याचे पोलीसांनी त्याला सांगितले होते. सदर साक्षिदाराने त्याचे उलटतपासात हे मान्य केले की, गाडी कोणी चोरी केली हे आधी त्याला माहित नव्हते, पोलीसांनी सांगितल्यावरून त्याला आरोपींची नावे माहिती झाली.

**१०.** अभियोग पक्षातर्फे साक्षिदार क्र.२ मुन्ना या पंचसाक्षिदाराचा पुरावा नोदंविण्यात आला. त्याने त्याचे पुराव्यादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सदर साक्षीदार हा प्रकरणास सुसंगत साक्ष देत नसल्याने सरकारी अधिवक्त्यांनी त्याला भारतीय पुरावा अधिनियमाचे कलम १५४ प्रमाणे सूचक प्रश्न विचारले. त्यामध्येही त्याने आरोपीने त्याचे समक्ष चोरी केलेली मोटर सायकल काढून देतो असे निवेदन दिल्याचे, त्याचे घरातून गाडी काढून दिली तसेच गाडीचा नंबर बदलून घेतल्याचे आरोपीने त्याचे समक्ष सांगितला व त्यानुसार पोलीसांनी त्याचे समक्ष पंचनामा केल्याच्या बाबी स्पष्टपणे नाकारल्या आहेत.

**११.** अभियोग पक्षाने साक्षिदार क्र.३ राम याची साक्ष नोंदविली असून त्याने त्याचे पुराव्यामध्ये घटना कधी, कुठे, काय घडली हे त्याला माहित नसल्याचे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार हा प्रकरणास सुसंगत साक्ष देत नसल्याने सरकारी अधिवक्त्यांनी त्याला भारतीय पुरावा अधिनियमाचे कलम १५४ प्रमाणे सूचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामध्येदेखील त्याने फिर्यादीची मोटर सायकल चोरीला गेली होती व पोलीसांनी त्याचे बयाण नोंदविले असून त्याने त्याचे बयाणातील अधोरेखांकित भाग–अ पोलीसांना सांगितला असल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे.

१२. अभियोग पक्षाने आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता तपासी अधिकारी साक्षिदार क्र.४ श्री. केळझरकर यांना तपासले. त्यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, दि.१२/०२/२०१७ रोजी ते रामनगर पोलीस स्टेशन येथे कार्यरत होते. त्या दिवशी त्यांच्याकडे अपराध क्र.१२७४/२०१६ चा तपास कागदपत्रांसह देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी आरोपींचा शोध घेतला, आरोपींकडून मोटर सायकल जप्त करून जप्ती पंचनामा (नि.क्र.७२) तयार केला. आरोपींचा कबुली जबाब नोंदविला, साक्षिदारांचे बयाण त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले व तपासाअंती त्यांनी आरोपींविरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षिदाराने त्याने उलटतपासात हे मान्य केले की, ते घटनास्थळावर गेले नाही व घटनास्थळावरील साक्षिदारांचे बयाण नोंदविले नाही. जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षिदार हा पोलीस स्टेशनमध्ये साफसफाईचे काम करत आहे. याव्यतिरीक्त त्यांनी बचाव पक्षातर्फे विचारण्यात आलेल्या इतर उत्तरसूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलेली आहे.

१३. अभिलेखावर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षिदार क्र.१ दिनानाथ हा प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी आहे. सदर साक्षिदाराने त्याचे पुराव्यामध्ये त्याची मोटर सायकल चोरी गेल्याचे कथन केले आहे व त्याप्रमाणे त्याने पोलीस स्टेशनला तक्रार दिली असल्याचे कथन केले आहे. सा.क्र.१ दिनानाथ याने त्याची मोटर सायकल पार्कींगमध्ये लावली होती असे कथन केले आहे. परंतु, सदर बाबीला दुजोरा देणारा साक्षिदारांचा पुरावा दिलेला नाही व अभिलेखावर आलेला नाही. सदर मोटर सायकल आरोपींनी चोरली होती ही बाब त्यांना पोलीसांकडून माहित झालेली आहे. आरोपींना मोटर सायकल चोरतांना पाहणारा कोणीही साक्षिदार अभियोग पक्षाला मिळून आलेला नाही.

**१४.** साक्षिदार क्र.२ मुन्ना हा निवेदन व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षिदार आहे. सदरचा साक्षिदार हा महत्वाचा साक्षिदार आहे. परंतु, सदर साक्षिदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. सदर साक्षिदाराच्या पुराव्यामधून आरोपींच्या ताब्यातून मोटर सायकल जप्त करण्यात आली असल्याबाबत कोणताही खुलासा अभियोग पक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही. सा.क्र.४ श्री. केळझरकर यांनी पंच साक्षिदारांच्या समक्ष मोटर सायकलचा जप्ती पंचनामा केला असल्याचे कथन केले आहे. सा.क्र.२ मुन्ना याने त्याचे समक्ष जप्ती पंचनामा करण्यात आला असल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. सा.क्र.२ मुन्ना व तपासी अंमलदार सा.क्र.४ श्री. केळझरकर हे एकमेकांना विसंगत अशी साक्ष देत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जप्ती पंचनामा हा संशयाच्या पलीकडे जाऊन सिद्ध झालेला नाही.

**१५.** साक्षिदार क्र.१ दिनानाथ याने त्याची मोटर सायकल चोरीला गेली होती असे कथन केलेले आहे. त्याचे कथनाला दुजोरा देणारा साक्षिदारांचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सा.क्र.३ राम हा फिर्यादीच्या ओळखीचा आहे. त्याला घटना कधी, कोठे, काय घडली याबाबत काहीही माहिती नाही. त्याचे पुराव्यामधूनही सा.क्र.१ दिनानाथ याची मोटर सायकल आरोपींनी चोरली होती याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सा.क्र.३ राम याने त्याचे बयाण बरोबर नसल्याचे कथन केले आहे. याउलट, तपासी अंमलदार सा.क्र.४ श्री. केळझरकर यांनी सा.क्र.३ राम याचे सांगण्याप्रमाणे बयाण नोंदविले असल्याचे कथन केले आहे. सा.क्र.३ राम व ४ श्री. केळझरकर हे एकमेकांशी विसंगत असे कथन करत आहे. त्यामुळे केवळ तपासी अंमलदार यांच्या पुराव्यावर विसंबून राहून आरोपींनी गुन्हा केला आहे असा निष्कर्ष काढणे योग्य व न्यायोचित होणार नाही.

१६. साक्षिदार क्र.४ श्री. केळझरकर यांनी घटनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांचे बयाण नोंदविले नाही. सा.क्र.२ मुन्ना हा पोलीस स्टेशनमध्ये साफसफाईचे काम करत आहे. त्यामुळे तपासी अंमलदार यांनी जप्ती पंचनामा जप्तीच्या ठिकाणी केला असल्याबाबत संशय निर्माण होत आहे. अभियोग पक्षाला सा.क्र.१ दिनानाथ याची मोटर सायकल ची चोरी आरोपींनी केली याबाबतचा पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही.

१७. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून साक्षिदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षिदार नाहीत. साक्षिदार क्र.१ ते ३ यांनी फिर्यादीची मोटर सायकल कोणाकडून जप्त केली व कोणी चोरली होती याबाबत काहीही कथन केलेले नाही. अभियोग पक्षाला जप्ती पंचनामा सिद्ध करता आलेला नाही. फिर्यादीने फिर्याद देण्यास केलेल्या उशीराबाबतचा खुलासा अभिलेखावर आलेला नाही. सदर मोटर सायकल आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आली ही बाबही अभियोग पक्ष सिद्ध करू शकलेला नाही. अभियोग पक्षाला आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीची मोटर सायकल स्वतःच्या फायद्यासाठी लबाडीचे इराद्याने चोरून नेली, ही बाब संशयाच्या पलीकडे जाऊन सिद्ध करता आलेली नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरत आहेत. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

## मुद्दा क्र.२ करीता

१८. उपरोक्त मुद्दांच्या निष्कर्षांवरून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त मुद्देमाल एक मोटर सायकल नोंदणी क्र. एम.एच.३४–यु.८७०४ चा अंतरीम ताबा अपीलाचा कालावधी संपल्यानंतर मुळ मालकाकडे कायम करणे योग्य व न्यायोचित होईल. आरोपीला फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर

उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतीभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. म्हणून मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

**१.** आरोपी क्र.१ अमीत सुभाष विश्वास व आरोपी क्र.२ मिलन मिर्णाल हलदार यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये असलेल्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

**३.** जप्त मुद्देमाल एक मोटर सायकल नोंदणी क्र. एम.एच.३४–यु.८७०४ चा अंतरीम ताबा अपीलाचा कालावधी संपल्यानंतर मुळ मालकाकडे कायम करण्यात येत आहे.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाविरूद्ध अपिल दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रकमेचे जमानतपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHIVAJI RADHU GULAVE
Date: 2026.08.13 17:51:00 +0530

**(शिवाजी आर. गुळवे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.४), चंद्रपूर

स्थळ :– चंद्रपूर
दिनांक :– १३/०८/२०२६

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | सुचिता शै. राऊत, लघुलेखक श्रेणी–३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (कोर्ट क्र.४) चंद्रपूर. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | १३/०८/२०२६ |